12 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डॉ. एस. व्ही. शर्मा : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

# नीतिमूल्यांच्या जोपासनेमुळेच 'इस्रो' यशस्वी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : 'भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) सदैव नीतिमूल्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले. नीतिमूल्यांच्या प्रामाणिक जोपासनेमुळेच आजवरचे यश प्राप्त करणे शक्य झाले आहे', असे प्रतिपादन इस्रोचे उपसंचालक डॉ. एस.व्ही. शर्मा यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'मीट द सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत त्यांचे आणि वरिष्ठ अभियंता डॉ. आर. श्रीविद्या यांचे विशेष व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे प्रमुख उपस्थित होते. डॉ. शर्मा यांनी 'भारतातील अवकाश संशोधनाची उत्क्रांती' या विषयावर, तर डॉ. श्रीविद्या यांनी 'चांद्रयान, आदित्य आणि भारताचे उपग्रह प्रकल्प' या विषयांवर विचार मांडले.

डॉ. शर्मा म्हणाले, 'अथक व सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त, निर्धार आणि समर्पण या बाबी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक असतात. यशाला कोणताही शॉर्टकट असत नाही. इस्रोमध्ये हीच संस्कृती रुजलेली आहे. कोणतेही काम या मूल्यांच्या प्रामाणिक जोपासनेमुळे तडीस नेणे शक्य होते. इस्रोमधील प्रत्येकाचा स्वतःवर विश्वास आहे. हा आत्मविश्वासच आम्हाला सातत्याने चांगल्या कामासाठी प्रेरित करतो. हार मानणे आम्हाला मंजूर नाही. म्हणूनच भारतीयांचा इस्रोवर प्रचंड विश्वास आहे. या विश्वास, प्रेमामुळेच सर्वोत्तम काम करण्याची प्रेरणा आम्हाला मिळते. इस्रोमध्ये आम्ही सारे शास्त्रज्ञ आहोत, येथे आमच्यात जात, धर्म, लिंग, प्रांत, भाषा आदी कोणताही परस्परभेद नाही, ही आपली संस्कृती आहे. आपली संस्कृती, आपले तंत्रज्ञान यावर आमचा विश्वास आहे.'

या कार्यक्रमात डॉ. आर. श्रीविद्या यांनी इस्रोच्या विविध अवकाश मोहिमांसह चांद्रयान, आदित्य या मोहिमांची वैशिष्ट्ये सांगितली. भारताच्या अवकाश संशोधन मोहिमांचे वेगळेपण सांगितले. दोन्ही शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे सुमारे तासभर समाधान केले. डॉ. राजीव व्हटकर यांनी प्रास्ताविक केले. पदार्थ विज्ञान अधिविभागाचे प्रमुख केशव राजपुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. व्ही. एस. कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. नीलेश तरवाळ यांनी आभार मानले.



कोल्हापूर : 'मीट दि सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत व्याख्यानात बोलताना डॉ. एस. व्ही. शर्मा.



कोल्हापूर : विशेष व्याख्यानात बोलताना इस्रोच्या वरिष्ठ अभियंत्या डॉ. आर. श्रीविद्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी 'मीट दि सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत विशेष व्याख्यानाला विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

### डॉ. शर्मा यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

- आपल्या संस्कृतीमधील चांगल्या गोष्टी पुढे घेऊन जाण्यासाठी आग्रही असावे.
- जगभरात चाललेल्या घटना-घडामोडींबाबत सजग रहावे.
- कोणाच्याही मागे जाऊ नये. मात्र, सर्वांकडून शिकत राहायला हवे.
- आपण विचार करणे विसरत चाललो आहोत. विचार करू या, प्रश्न विचारू या.



## 'संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'इस्रो'ची ताकद'

कोल्हापूर, ता. ११ : विद्यार्थ्यांनी मूलभूत क्षेत्रात संशोधन करावे. त्यासाठी तांत्रिक स्वरूपातील मार्गदर्शनाची ताकद भारतीय अंतराळ संशोधन संस्थेकडून (इस्रो) दिले जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत उच्च शिक्षणात स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे. संबंधित विषय शालेय अभ्यासक्रमात आणण्याचा आमचा प्रयत्न सुरू असल्याचे 'इस्रो'चे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी आज येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानानिमित्त ते कोल्हापुरात आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांमध्ये अवकाश संशोधन, विज्ञानाबाबत आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांच्यासाठी विविध उपक्रम आम्ही राबवितो. 'इस्रो'चे शास्त्रज्ञ, अभियंते त्यांच्याशी संवाद साधतात. आमच्या श्रीहरिकोटा, बंगळूर, अहमदाबाद, त्रिवेंद्रम येथील केंद्रांना वर्षभरात सुमारे एक लाख विद्यार्थी भेट देवून माहिती घेतात. त्यांना मार्गदर्शन करण्याची सुविधा या केंद्रांमध्ये केली आहे. संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी 'इस्रो'कडून रिस्पॉन्स स्कीम (प्रतिसाद योजना) राबविली जाते. याअंतर्गत विद्यार्थी, नागरिक त्यांच्या संशोधनाबाबत ऑनलाईन माहिती सादर करू शकतात. त्यातील संशोधनाची सामाजिक उपयुक्तता पाहून त्यांना मार्गदर्शन केले जाते. संशोधन पुढे नेण्यासाठी ताकद दिली जात असल्याचे डॉ. शर्मा यांनी सांगितले.

### शिवाजी विद्यापीठासमवेत संशोधन

- शिवाजी विद्यापीठ आणि इस्रो यांचे एकत्रितपणे संशोधन क्षेत्रात काम सुरु आहे. भविष्यात विद्यापीठासमवेत सामंजस्य करार करण्याचा विचार असल्याचे डॉ. शर्मा यांनी सांगितले. विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रासाठी 'इस्रो'ने इंडियन रिजनल नॅव्हीगेशनल सॅटेलाईट सिस्टीम उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठातील नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील दोन विद्यार्थिनींची संशोधनासाठी 'इस्रो'मध्ये निवड झाली असल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.

12 SEP 2023

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# India's faith in us motivates us to do our best work, says Isro deputy director S V Sharma


TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: Indian Space Research Organisation (Isro) deputy director S V Sharma and scientist R Srividhya on Monday visited the Shivaji University Kolhapur (SUK) as part of the 'Meet the Scientist' activity.

Delivering his speech on "Evolution of Space Research in India" to post-graduate and research students, and professors from various departments of the university, Dr Sharma said, "Relentless and consistent hard work, discipline, determination and dedication are essential to succeed in life. There is no shortcut to success. This is the culture rooted in Isro."

The deputy director continued encouraging students to imbibe the cultural values at Isro.

"Any work can be accomplished through sincere cultivation of these values. Similarly, everyone in Isro believes in themselves. It is this confidence that motivates us to consistently do better. We are not allowed to give up.



TOI

Deputy director S V Sharma gives a speech about the cultural values at Isro

We avoid past mistakes and start new tasks until they succeed. This is why Indians have great faith in Isro. It is this faith that motivates us to do our best work," Sharma said.

Sharma added that Isro has been making its space exploration missions successful by saving the maximum amount of money by considering the welfare of the countrymen.

"We completed the Mars mission for a cost that is lesser than the cost of making a Hollywood movie. We were able to save Rs.50 crores," he added.

Completing his speech, the deputy director said, "At Isro we are all scientists, there is no difference between caste, religion, gender, region, language. We believe in our culture and our technology. Students should insist on carrying forward the good things in their culture. We should be aware of the happenings around the world. But do not follow anyone and we should keep learning from everyone. We are forgetting to think. Let's start thinking and asking questions. From there, we continue to progress towards knowledge. This is the path that will lead us to success."

Senior engineer of Isro scientist R. Srividhya shared the features of Isro's various space missions including Chandrayaan-3 and Aditya-L1. She explained in great detail about India's space exploration missions.

Both scientists also held a question and answer session at the end.

In the afternoon session Dr. Sharma visited the service-facility centers and various departments of the university.

In the evening, there was a discussion on "Nation Building and Role of Educational Institutions" with heads of departments and teachers of the university.

12 SEP 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हार मानणे आम्हाला मंजूर नाही

## इस्त्रोचे उपसंचालक डॉ. शर्मा; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

दरवर्षी इस्त्रोकडून अनेक उपग्रह अवकाशात सोडले जातात. यातील काही यशस्वी होतात तर काही अपयशी, पण म्हणून आम्ही हार मानत नाही. मागील चुका टाळून नव्याने कामाला लागतो. त्यामुळेच चंद्रयान ३ यशस्वी झाले, असे उद्‌गार इस्त्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'भारतातील अवकाश संशोधनाची उत्क्रांती' या कार्यक्रमात डॉ. शर्मा तसेच श्रीविद्या यांनी 'चांद्रयान, आदित्य आणि भारताचे उपग्रह प्रकल्प' या विषयांवर माहिती दिली.

डॉ. शर्मा म्हणाले, भारतीयांचा इस्त्रोवर प्रचंड विश्वास आहे. या विश्वास व प्रेमामुळेच सर्वोत्तम काम करण्याची प्रेरणा आम्हाला मिळते. इस्त्रोही या विश्वासाला जागून देशबांधवांच्या पै न पैचा विचार करून जास्तीत जास्त बचत करीत आपल्या अवकाश संशोधन मोहिमा यशस्वी करीत आली आहे. इस्त्रोमधील शास्त्रज्ञांमध्ये जात, धर्म, लिंग, प्रांत, भाषा आदी कोणताही परस्परभेद नाही. आपली संस्कृती, आपले तंत्रज्ञान यावर आमचा विश्वास आहे. विद्यार्थ्यांनीही आपल्या संस्कृतीमधल्या चांगल्या गोष्टी पुढे घेऊन जाण्यासाठी आग्रही असायला हवे.



कोल्हापूर : विद्यापीठात 'मीट दि सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना इस्त्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा. शेजारी डॉ. केशव राजपुरे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. आर. श्रीविद्या आणि सिद्धार्थ शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

यावेळी इस्त्रोच्या वरिष्ठ अभियंता डॉ. आर. श्रीविद्या यांनी इस्त्रोच्या विविध अवकाश मोहिमांसह चांद्रयान व आदित्य या मोहिमांची माहिती दिली डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. केशव राजपुरे यांनी परिचय करून दिला. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलेश तरवाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

12 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# नितीमूल्ये जोपासण्याला 'इस्रो'चे प्राधान्य

## इस्त्रोचे उपसंचालक डॉ. एस.व्ही. शर्मा यांचे प्रतिपादन : यशाला कोणताही शॉर्टकट नाही

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) सदैव नितीमूल्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले. नितीमूल्यांच्या प्रामाणिक जोपासनेमुळेच आजवरचे यश प्राप्त करणे शक्य झाले आहे, असे प्रतिपादन इस्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी केले.

इस्रोने अलीकडेच 'चांद्रयान-३' आणि 'आदित्य एल-१' या दोन मोहिमांतर्गत उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण केले आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने इस्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा आणि वरिष्ठ अभियंता डॉ. आर श्रीविद्या यांना 'मीट द सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शर्मा यांनी 'भारतातील अवकाश संशोधनाची उत्क्रांती' या विषयावर, तर डॉ. श्रीविद्या यांनी 'चांद्रयान, आदित्य आणि भारताचे उपग्रह प्रकल्प' या विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. शर्मा यांनी विद्यापीठातील



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'मीट दि सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना इस्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा. सोबत डॉ. केशव राजपुरे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. श्रीविद्या, सिद्धार्थ शिंदे, समोर उपस्थित श्रोते.

सेवा-सुविधा केंद्रे आणि अधिविभागांना भेटी दिल्या. संध्याकाळी विद्यापीठातील अधिविभाग प्रमुख आणि शिक्षकांसोबत 'राष्ट्र निर्माण आणि शैक्षणिक संस्थेची भूमिका' या विषयावर संवाद साधला.

डॉ. शर्मा म्हणाले, अथक व सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त, निर्धार आणि समर्पण या बाबी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक असतात. यशाला कोणताही शॉर्टकट नसतो, ही संस्कृती इस्रोमध्ये रुजलेली आहे. कोणतेही काम या मूल्यांच्या प्रामाणिक जोपासनेमुळे तडीस नेणे शक्य होते. त्याचप्रमाणे इस्रोमध्ये प्रत्येकाचा स्वत:वर विश्वास आहे. हा आत्मविश्वासच आम्हाला सातत्याने चांगल्या कामासाठी प्रेरित करतो. मागील चुका टाळून नव्याने कामाला लागून ते यशस्वी होईपर्यंत आम्ही थांबत नाही. म्हणूनच भारतीयांचा इस्रोवर प्रचंड विश्वास आहे. या विश्वासामुळेच शास्त्रज्ञांना प्रेरणा मिळते. इस्रोही या विश्वासाला जागून देशबांधवांच्या पै न पैचा विचार करून जास्तीत जास्त बचत करीत अवकाश संशोधन मोहिमा यशस्वी करेल. मंगळ मोहीम हॉलिवूड चित्रपटाच्या खर्चापेक्षाही कमी खर्चात पूर्ण केली. शिवाय, ५० कोटी रुपये वाचवले. इस्रोमध्ये सारे शास्त्रज्ञ असून जात, धर्म, लिंग, प्रांत, भाषा कोणताही परस्परभेद नाही. भारताची संस्कृती व तंत्रज्ञानावर शास्त्रज्ञांचा विश्वास आहे. विद्यार्थ्यांनीही संस्कृतीमधल्या चांगल्या गोष्टी पुढे घेऊन जाण्यासाठी आग्रही असायला हवे. जगभरात चाललेल्या घटना-घडामोडींबाबत सजग असायला हवे. पण कोणाच्याही मागे न जाता सर्वांकडून शिकत राहायला हवे. प्रश्न विचारून ज्ञानवृद्धीच्या दिशेने जात राहतो. हाच मार्ग आपल्याला यशाकडे घेऊन जाईल.

इस्रोच्या वरिष्ठ अभियंता डॉ. आर. श्रीविद्या यांनी इस्रोच्या विविध अवकाश मोहिमांसह चांद्रयान व आदित्य या मोहिमांची वैशिष्ट्ये सांगितली. भारताच्या अवकाश संशोधन मोहिमांचे वेगळेपण समजावून सांगितले. दोन्ही शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले.

विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. केशव राजपुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलेश तरवाळ यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक उपस्थित होते.

12 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# अवकाश, विज्ञान, तंत्रज्ञानाचा अभ्यास करावा

- इस्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरणातील नवीन अभ्यासक्रमात अवकाश संशोधन समाविष्ट करण्याच्या सूचना इस्रोने दिल्या आहेत. इस्रो संशोधनाला प्राधान्य देत असून शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांनी अवकाश, विज्ञान व तंत्रज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे, असे आवाहन आयोजित पत्रकार परिषदेत इस्रोचे संचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी केले.

डॉ. शर्मा म्हणाले, इस्रोने चांद्रयान तीन आणि आदित्य एल वनची मोहीम इस्रोने




यशस्वी केली आहे. चांद्रयान तीनच्या ग्रोव्हरचे चार्जिंग संपल्याने तो सध्या बंद आहे. परंतु येत्या नऊ ते दहा दिवसात तो चार्जिंग झाला तर पुन्हा आपल्याला माहिती मिळेल. प्रतिवर्षी देशभरातील इस्रोच्या सेंटरला जवळपास एक लाख विद्यार्थी भेट देतात. शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी इस्रोमध्ये संशोधन करीत आहेत. भविष्यात विद्यापीठाकडून योग्य प्रस्ताव आल्यास इस्रो शिवाजी विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार करण्यास तयार आहे. तसेच पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला दिलेल्या सॉफ्टवेअरमधून डेटा संकलनाचे काम केले जाते. संशोधक विद्यार्थी इस्रोमध्ये अभ्यास करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात. सर्वांसाठी इस्रोचे संकेतस्थळ खुले आहे. सोशल मिडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात ज्ञान उपलब्ध आहे. त्याचा सर्वाधिक फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. कोल्हापूरमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांची गुणवत्ता पाहून प्रभावीत झालो, असे उद्‌गार इस्रो उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी पत्रकार परीषदेत काढले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला इस्रोने यंत्र सामग्री दिली आहे. त्याचे काम सुरू आहे. विद्यापीठाच्या दोन विद्यार्थीनी इस्त्रोमध्ये संशोधन करीत आहेत. भविष्यात जास्तीत जास्त विद्यार्थी इस्रोमध्ये संशोधनासाठी जावेत, यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्न करणार आहे. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचीव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे, डॉ. केशव राजपुरे डॉ. राजीव व्हटकर, डॉ. निलेश तरवाळ आदी उपस्थित होते.

आदित्य एल-वन हालचाली टिपेल

आदित्य एल-वन दोन सप्टेंबर रोजी सूर्याच्या दिशेने झेपावले आहे. चार महिन्यानंतर आदित्य एल-वन सूर्याच्या कक्षेत जाईल. त्यामध्ये सात उपकरणे बसवली आहेत. सूर्याची यात्रा करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक व पार्टीकल फील्ड डिटेक्टरद्वारे पृथ्वीवरील उर्जा व अंतरळाच्या हालचाली टिपेल.

लोकमत


एस. व्ही. शर्मा


आर. श्रीविद्या

# नीतिमूल्ये जोपासल्याने इस्रोला सर्वोच्च यश

## एस. व्ही. शर्मा : विद्यापीठात विशेष व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अथक व सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त, निर्धार आणि समर्पण या बाबी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक असतात. यशाला कोणताही शॉर्टकट असत नाही. भारतीय अवकाश संशोधन संस्थेमध्ये (इस्रो) हीच संस्कृती रुजली आहे. नीतिमूल्यांच्या प्रामाणिक जोपासनेमुळेच आजवरचे यश प्राप्त करणे शक्य झाले, असे प्रतिपादन इस्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठात 'भारतातील अवकाश संशोधनाची उत्क्रांती' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शर्मा म्हणाले, हार मानणे आम्हाला मंजूर नाही. मागील चुका टाळून नव्याने कामाला लागून ते यशस्वी होईपर्यंत आम्ही थांबत नाही.

### चांगल्यासाठी आग्रही

इस्रोमध्ये आमच्यात जात, धर्म, लिंग, प्रांत, भाषा आदी कोणताही परस्परभेद नाही; ही आपली संस्कृती असल्याचे सांगून डॉ. शर्मा म्हणाले, आपली संस्कृती, आपले तंत्रज्ञान यावर आमचा विश्वास आहे. विद्यार्थ्यांनीही आपल्या संस्कृतीमधल्या चांगल्या गोष्टींसाठी आग्रही असायला हवे.

म्हणूनच भारतीयांचा इस्रोवर प्रचंड विश्वास आहे. मंगळ मोहीम आम्ही हॉलिवूड चित्रपटाच्या खर्चापेक्षाही कमी खर्चात पूर्ण केली. शिवाय, ५० कोटी रुपये आम्ही वाचवू शकलो.

यावेळी इस्रोच्या वरिष्ठ अभियंता डॉ. आर. श्रीविद्या यांनी "चंद्रयान, आदित्य आणि भारताचे उपग्रह प्रकल्प" या विषयांवर व्याख्यान दिले. दोन्ही शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले. डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत केले. डॉ. केशव राजपुरे पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलेश तरवाळ यांनी आभार मानले.

12 SEP 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अवकाश संशोधनाबाबत शाळांमध्ये जनजागृतीसाठी प्रयत्न

## एस. व्ही. शर्मा : संशोधन वाढण्यासाठी चांगल्या प्रकल्पांना 'इस्रो'च्या वतीने अनुदान

कोल्हापूर : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेबाबत (इस्रो) विद्यार्थी, सर्वसामान्यांबाबत प्रचंड कुतूहल आहे. अवकाश संशोधनाबाबत शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृती व्हावी यादृष्टीने अभियंते प्रयत्न करत असल्याची माहिती उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांनी सोमवारी कोल्हापुरात पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, चांद्रयान-३ यशस्वी झाल्यानंतर आदित्य एल -१ ही मोहीम सुरू केली आहे. आदित्य एल-वनचा प्रवास सुरू आहे. नंतर गगनयान मोहीम हाती घेणार आहे. 'इस्रो'मध्ये नवनवे संशोधन सुरू आहे. 'इस्रो'च्या कामाबाबत विद्यार्थ्यांत कुतूहल आहे. 'इस्रो'चे अभियंते, शास्त्रज्ञ याची माहिती देऊन जनजागृती करीत आहेत. महाविद्यालयीन-विद्यापीठ स्तरावर अवकाश संशोधन वाढावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

विद्यार्थ्यांच्या चांगल्या प्रकल्पांना अनुदान दिले जाते. नव्या शैक्षणिक धोरणात अवकाश संशोधनावर अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे. शिवाजी विद्यापीठ व 'इस्रो' यांच्यात सर्व पातळींवर आदान-प्रदान सुरू आहे. गरज भासल्यास सामंजस्य करार केला जाईल, असेही डॉ. शर्मा यांनी स्पष्ट केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सिद्धार्थ शिंदे, आदी उपस्थित होते.

### प्रत्येक वर्षी एक लाख विद्यार्थ्यांची भेट

- 'इस्रो'च्या कार्याबाबतची माहिती व्हावी, यासाठी बेंगलोर, अहमदाबाद, श्रीहरीकोटा आणि त्रिवेंद्रमच्या केंद्रांना विद्यार्थ्यांची भेट घडवून आणली जाते.
- प्रत्येक वर्षी एक लाख विद्यार्थी या केंद्रांना भेटी देत असल्याचे डॉ. शर्मा यांनी सांगितले.

12 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व प्रेरणादायी

## डॉ. फुकाहारी यासुकाता यांची भावना : शिवाजी विद्यापीठात इंडो–जपान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषद

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर अखिल भारताचे आराध्यदैवत आहे. त्यांचे कार्यकर्तृत्व पिढ्यानपिढ्यांना प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांच्या नावे असलेल्या विद्यापीठांत प्रथमच येत असताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, अशी भावना मुंबईतील जपानचे कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता यांनी आज येथे व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या इंडो–जपान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या पूर्वसंध्येला डॉ. यासुकाता यांचे विद्यापीठात आगमन झाले. त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. यप्रसंगी ते बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. यासुकाता यांच्यासमवेत जपानी वकिलातीच्या संस्कृती व माहिती विभागाच्या कॉन्सूल हामुरो मेगुमि उपस्थित होत्या. जपाणी पाहुण्यांचे स्वागत 'शिवाजी दि ग्रेट' हा ग्रंथ भेट देऊन केले.



जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता यांचे शिवचरित्र ग्रंथ भेट देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. एस.बी. सादळे, हामुरी मेगुमि, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

डॉ. यासुकाता म्हणाले, भारत देशात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी प्रचंड आदर दिसून येतो. महाराष्ट्रभूमी तर आजही त्यांची ऋणी आहे. त्यामुळे येथे विविध स्मारकांना व वास्तूंना त्यांचे नाव दिल्याचे दिसते. शिवाजी विद्यापीठासारखी शैक्षणिक संस्थाही महाराजांच्या नावे उभी आहे, याचाही अभिमान वाटतो. महाराजांचा विद्यापीठाच्या प्रांगणातील भव्य पुतळा पाहून प्रचंड प्रभावित झाल्याचे त्यांनी सांगितले. भारत आणि जपान या दोन्ही राष्ट्रांमध्ये अनेक प्रकारची साम्यस्थळे आहेत. दोन्ही देशांमध्ये प्राचीन काळापासून विविध प्रकारचे सहसंबंध राहिले आहेत. दोन्ही शांतिप्रिय देश असून मानवतेच्या उदात्त कल्याणासाठी झटणारे आहेत. मानवतेचा विचार येथे सर्वोच्च स्थानी आहे. दोन्ही देशांना परस्परांच्या संस्कृतीविषयी जाणून घेण्याची ओढ आहे. त्यामुळेच या देशांत भाषिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक तसेच तंत्रज्ञानात्मक बंध सातत्याने अधिकाधिक विकसित होताना दिसतात.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विदेशी भाषा विभागात जपानी भाषा शिकण्याकडे कोल्हापूर परिसरातील विद्यार्थी, उद्योजक व व्यावसायिकांचा कल वाढत आहे. जपानशी स्थानिक नागरिकांचे संबंध दृढ होत आहेत. जपानमधील विविध विद्यापीठांशी शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार असून अनेक शिक्षक, विद्यार्थी तेथील विद्यापीठांमध्ये शिकत वा शिकवत आहेत. स्वत: प्र–कुलगुरू डॉ. पाटील आणि डॉ. सादळे हे जपानी विद्यापीठांशी शैक्षणिक संबंध राखून आहेत. भविष्यात शिवाजी विद्यापीठाचे जपानशी असणारे बंध अधिक वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न राहील.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परिषद समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

12 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शालेय विद्यार्थ्यांची मने झाली 'ईग्नाईट'

## आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधकांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भारतासारख्या देशासमोर बेरोजगारीचे संकट गहिरे होणार नाही का? मानवी मेंदूला मागे टाकून हे तंत्रज्ञान पुढे जाईल का, विज्ञान-तंत्रज्ञानात्मक प्रगती मानवतेला धोकादायक ठरेल का, जैवतंत्रज्ञानाच्या बाबतीत सरकारने कोणती धोरणे स्वीकारणे अभिप्रेत आहेत? चंद्रावर पूर्णपणे मानवरहित रोबोटिक प्रयोगशाळा उभारणे शक्य आहे का? सर्वसामान्यांच्या मनातही कधी ना कधी उमटणाऱ्या अशा अनेक प्रश्नांना विद्यार्थ्यांनी वाट मोकळी करून दिली.

निमित्त होते शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या तेराव्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हांतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेमध्ये आयोजित 'ईग्नाइटिंग माईंड्स ऑफ स्कूल चिल्ड्रेन'चे. हा उपक्रम वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहामध्ये होता. विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर मानवकल्याणासाठी केला पाहिजे, असे मान्यवरांनी सांगितले.



**कोल्हापूर : 'इग्नाइटिंग माईंड्स ऑफ स्कूल चिल्ड्रेन' उपक्रमात सहभागी विद्यार्थी आणि मार्गदर्शक संशोधक.**

ज्येष्ठ संशोधक डॉ. श्याम नंदी, जैवतंत्रशास्त्रज्ञ डॉ. स्मिता पवार, डॉ. जयकुमार सीलम, बनारस डॉ. शक्ती शहा आणि प्रा. डी. शक्ती कुमार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

उपक्रमात कोल्हापुरातील वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूल, कोरगावकर हायस्कूल, विद्यापीठ हायस्कूल, वि. स. खांडेकर प्रशाला, छत्रपती शाहू विद्यालय, सेव्हन्थ डे एडव्हांटिस्ट हायर सेकंडरी स्कूलमधील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

डॉ. आर. व्ही. गुरव यांनी स्वागत केले. डॉ. मनोज लेखक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. स्वरुपा पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आशिष देशमुख, डॉ. वर्षा जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे आदी उपस्थित होते.

तरूण भारत



कोल्हापूर : विद्यापीठातील बी. ए. स्पोर्टस् पदवी अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# आदर्श खेळाडूंनी जबाबदार नागरिक व्हावे

■ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

विद्यापीठातील बी. ए. स्पोर्टस् या पदवी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी देशाचे आदर्श खेळाडू आणि समाजातील जबाबदार नागरिक व्हावेत. विद्यार्थ्यांना एका पेक्षा जास्त खेळामध्ये पारंगत होण्याची संधी या माध्यमातून निर्माण झालेली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत नव्याने प्रारंभ करण्यात आलेल्या बी. ए. स्पोर्टस् या पदवी अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यप्रसंगी, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या अनेक संधी निर्माण झालेल्या आहेत. क्रीडा क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त महिला खेळाडूंनी सहभाग नोंदवून देशाचे नांव उज्वल करावे. संलग्नित महाविद्यालयांनी तालुका पातळीवर हा अभ्यासक्रम राबविल्यास त्यांना प्रोत्साहन मिळेल. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खेळामध्ये करिअर घडविण्याची मोठी संधी मिळेल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना क्रीडा कौशल्ये उंचावता येईल. आवश्यक त्या सोयी-सुविधांचा योग्य उपयोग करून परिश्रमपूर्वक अभ्यासक्र पूर्ण करून आयुष्याची दिशा निश्चित करावी. प्रास्ताविक क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ.शरद बनसोडे यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सुचय खोपडे उपस्थित होते.

12 SEP 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीकवृद्धीसाठी टाकाऊ चहापत्तीपासून सेंद्रिय नॅनो संयुग

## शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कोळेकर, वाघमारे यांच्या संशोधनाला भारतीय पेटंट





**कोल्हापूर :** स्वयंपाकघरात चहा शिजवल्यानंतर टाकून देण्यात येणाऱ्या चहापत्तीपासून कार्बन डॉट्स नॅनो संयुग तयार करण्याची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी यशस्वी करून दाखवली असून, या संशोधनाला नुकतेच भारतीय पेटंट प्रदान करण्यात आले. हे द्रावण पूर्णतः सेंद्रिय स्वरुपाचे असून, पीकवृद्धीसाठी अत्यंत परिणामकारक सिद्ध झाले आहे. विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. जी. बी. तथा गोविंद कोळेकर आणि डॉ. रवींद्र वाघमारे यांनी हे संशोधन केले आहे.

स्वयंपाकघरात चहा बनवल्यानंतर शिल्लक चहापत्ती टाकून देण्यात येते. विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी या चहापत्तीपासून कार्बन डॉट्स नॅनो मटेरिअल तयार केले. सदर संशोधन पर्यावरणपूरक, कमी खर्चिक तसेच शाश्वत शेतीस उपयुक्त ठरणारे आहे. या संशोधनामुळे पिके जोमाने फोफावतात, मुळेही जोर धरतात. तसेच बियाणांची उगवण क्षमताही वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

सुरुवातीला या नॅनो मटेरिअलचा मेथीच्या बियांवर प्रयोग करण्यात आला. प्रयोगात मेथीच्या बियांनी अधिक पाणी शोषूण घेतले, तसेच या बियांची उगवण क्षमता वाढल्याचे लक्षात आले. मेथीच्या रोपट्यांची मुळे, तसेच मेथीचे रोपटेही तितक्याच जोमाने वाढत असल्याचे संशोधकांच्या लक्षात आले.

कार्बन डॉट्स नॅनो मटेरिअल द्रव स्वरूपात आहे. त्यामुळे याची फवारणी केल्यास पिकांची वाढ गतीने होते. यासाठी डॉ. कोळेकर यांना डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. मानसिंगराज निंबाळकर, डॉ. अनिल गोरे, डॉ. वैभव नाईक, डॉ. दत्ता गुंजाळ यांचे सहकार्य लाभले.

### आरोग्यावरील दुष्परिणाम कमी करण्यास मदत...

रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. रसायनयुक्त फळे आणि भाजीपाल्याचे सेवन केल्याने कर्करोगासह अनेक दुर्धर आजार होतात. यावर उपाय म्हणून रासायनिक खतांची मात्रा कमी करून सेंद्रीय शेतीवर भर द्यावा. यासाठी चहापत्तीपासून तयार केलेल्या कार्बन डॉट्स नॅनो मटेरिअलचा वापर केल्यास पिकांची गुणवत्ता चांगली राहून नागरिकांच्या आरोग्यावरील संभाव्य दुष्परिणाम कमी करण्यास मदत होईल, असेही डॉ. कोळेकर यांनी सांगितले.

### रासायनिक खतांची मात्रा घटवणे शक्य...

पिकांची वाढ जोमात व्हावी म्हणून शेतकरी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. या खतांचे पिकांसह जमिनीच्या पोतावर व मानवी आरोग्यवरही दुष्परिणाम होतात. शेतकऱ्यांनी चहापत्तीपासून बनविलेल्या कार्बन डॉट्स नॅनो मटेरिअल संयुगाचा वापर केल्यास रासायनिक खतांची मात्रा कमी करणे शक्य होणार आहे, असे डॉ. गोविंद कोळेकर यांनी सांगितले.

### समाजोपयोगी संशोधन शेतकऱ्यांना वरदायी...

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी अलीकडील काळात सातत्याने समाजोपयोगी संशोधने करून त्यासाठी विविध पेटंटही प्राप्त केले आहेत, ही अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. सेंद्रिय नॅनो संयुगही जोमदार पीकवाढीसाठी शेतकऱ्यांना वरदायी ठरेल. विद्यापीठातील अधिविभागांसह महाविद्यालयांमधून संशोधन करणाऱ्या संशोधकांनी आपल्या नजरेसमोर ही सामाजिक दायित्वाची भावना ठेवून संशोधनकार्य करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

पुढारी

# पर्यावरण संवर्धनासाठी एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहावे : डॉ. शिंदे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करण्याचे काम एनसीसी विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. १ महाराष्ट्र बॅटरी एन. सी.सी. युनिटच्या वतीने आयोजित वार्षिक प्रशिक्षण शिबिरात बोलत होते.

एन.सी.सी. भवन येथे शिबिरात ड्रिल, हत्यार प्रशिक्षण, नकाशा वाचन, फायरिंग याचे प्रशिक्षण देण्यात आले. मराठा इतिहास आणि संस्कृती, आरोग्य व प्रथमोपचार या विषयावर डॉ अवनीश पाटील, डॉ. विनिता रानडे, सजेश महाराज यांची व्याख्याने झाले. सांस्कृतिक कार्यक्रमाने या शिबिराची सांगता झाली. याचे आयोजन लेफ्टनंट कर्नल एम. मुथना, ब्रिगेडिअर अभिजित वाळिंबे यांनी केले. एकूण ५३० एन.सी.सी. छात्रांनी यशस्वीपणे हे शिबिर पूर्ण केले.

12 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वर्षात २९९ पदकांची कमाई

## शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाची दमदार कामगिरी

**डेटा रिसर्च**



> शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. कुलगुरूंच्या संकल्पनेतून मिशन ऑलिम्पिकसारखे उपक्रम राबवले असून, याचे सकारात्मक परिणाम दिसतील.
>
> **-डॉ. शरद बनसोडे,** संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण.

**▸ सुयोग घाटगे : सकाळ वृत्तसेवा**


कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने २०२२ -२३ या वर्षात २९९ पदकांची कमाई केली आहे.

पश्चिम विभागीय स्पर्धा, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा, क्रीडा महोत्सव, खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धांसह आंतरराष्ट्रीय स्पर्धांतही विभागाच्या खेळाडूंनी चमक दाखवली आहे. यासह विविध स्पर्धा आयोजन, कार्यशाळा व निवड चाचणी शिबिरामुळे खेळाडूंना उत्तम क्रीडा व्यासपीठ तयार झाले आहे.


### सहा खेळाडूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत ॲथलेटिक्सचे ३६ खेळाडू पात्र, तर सांघिकमध्ये बुद्धिबळ महिला व पुरुष, क्रिकेट महिला, व्हॉलीबॉल महिला, टेनिस पुरुष, बॅडमिंटन पुरुष, खो-खो पुरुष यांनी पात्रता गाठली. सहा खेळाडूंना राज्य शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला आहे.


### पश्चिम विभागीय स्पर्धा





### अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा




### तृतीय खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स




### २४ वा महाराष्ट्र क्रीडा महोत्सव



तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालयात किंवा पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थ्यांनी नियमित शुल्कासह १६ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारीत तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह १६ सप्टेंबरपर्यंत भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह (५० रूपये ज्यादा) २० सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह (३५० रूपये ज्यादा) २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय किंवा पदव्युत्तर अधिविभागांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज नियमित शुल्कासह १८ सप्टेंबरपर्यंत, विलंब शुल्कासह २१ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन स्वीकारायचा आहे. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज विद्यापीठात विनाविलंब शुल्कासह २० सप्टेंबरपर्यंत, विलंब व अतिविलंब शुल्कासह २३ सप्टेंबरपर्य जमा करावयाचे आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय आणि अधिविभागांनी याची दखल घेवून, वेळेत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे.

सकाळ

# परीक्षा अर्ज भरण्यास विद्यापीठाकडून मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडून हिवाळी सत्रात विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. त्यासाठी अर्ज भरण्यास विद्यापीठाने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना या परीक्षांसाठी १६ सप्टेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह आणि २० सप्टेंबरपर्यंत विलंब शुल्कासह, तर २२ सप्टेंबरपर्यंत अतिविलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहेत. त्यांनी ऑनलाईन अर्ज भरायचे आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी



# विद्यापीठ परीक्षा फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षांचे विनाविलंब शुल्क फॉर्म भरण्यास १६ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज करण्यास १८ सप्टेंबर तर विद्यापीठात थेट परीक्षा अर्ज जमा करण्याची मुदत २० सप्टेंबर करण्यात आली आहे. विलंब शुल्कासहित व अतिविलंब शुल्कासहित अर्ज करण्याची मुदत ही वाढवण्यात आली आहे.